# प्रेस नोट

## बनावट वेबसाईट नोंदणी करणारे रॅकेट पंजाब येथे उद्‌ध्वस्त, ४० हजार डोमेन उघडल्याचे निष्पन्न.

फिर्यादी नामे अजयकुमार ठाकूर रा.केशवनगर,मुंढवा,पुणे यांची ई.जी.कांटावाला प्रा.लि. ही कंपनी चीन मधील झोंगशान कॅमरे इलेक्ट्रॉनीक्स प्रा.लि. या कंपनीकडुन १० % ॲडव्हान्स पैसे देवून कच्चा माल आयात करुन वजनकाटे बनवुन संपुर्ण भारतामध्ये विक्रीसाठी पाठवित असते. त्यासाठी ते harvey@camry.com या मेल आय.डी.वर चीन मधील कंपनीशी संपर्कात होते.

दि.१०/१०/२०१६ रोजी फिर्यादी यांनी ७२,६७२ USD ची कच्च्या मालाची ऑर्डर पाठवून त्याचे १०% प्रमाणे ७००० USD भरले. तरीही परत त्यांचेकडे ३०% ॲडव्हान्स पेमेंट मागण्यात आले. १० % पेमेंट कॅमरे मेजरींग टेक्नॉलॉजी हॉगकॉंग या बॅकेच्या अकाऊंटवर न टाकता याच नावाच्या बर्सीलोना येथील अकाऊंटवर टाकण्यास सांगीतले होते. फिर्यादी यांना संशय आल्याने त्यांनी झोंगशान कॅमरे या कंपनीची फोनवरुन संपर्क साधून जादा रकमेच्या मागणीबावत विचारपूस करता १० % रक्कम कंपनीच्या नेहमीच्या अकाऊंटवर पोहोचली नसल्याचे व ३०% रक्कम मागणी केली नसल्याचे सांगण्यात आले. यावरुन फिर्यादी यांना मेल हॅक झाल्याचा संशय आल्याने त्यांनी अकाऊंटसला आलेला मेल काळजी पुर्वक पाहता त्यांना मेल harvey@camry.com यावरुन न येता harvey@camrry.com यावरुन आल्याचे लक्षात आल्याने त्यांनी दि.२९/११/२०१६ रोजी लष्कर पोलीस ठाणे,पुणे शहर येथे भादवि. कलम ४१९,४२० माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(डी), ४३ अन्वये गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास सायबर सेल,पुणे शहर करीत होती. तांत्रीक माहिती अन्वये फिर्यादीला आलेले मेल नायजेरीया येथून आल्याचे निष्पन्न झाले होते. परंतु सखोल तपासाअंती आरोपी नामे १) हरगुरुनाज करमसिंग विजयसिंग वय-२० रा.१५६ न्यू जवाहर नगर,जालंधर,पंजाब व २) परभनाज करमसिंग विजयसिंग वय-२५ रा.जालंधर,पंजाब हे निष्पन्न होत असल्याने त्यांना सायबर सेलचे महिला पोलीस निरीक्षक सौ.राधीका फडके, स.पो.नि.सचिन गवते व पथकाने दि.३१/०१/२०१७ रोजी त्यांचे कॉलसेंटर वर छापा टाकून अटक केली.

आरोपींच्या चौकशीमध्ये आरोपींनी स्वतःची बनावट आयडीयाबीझ नावाची डोमेन रजिस्ट्रेशन ची कंपनी सुरु केली होती. ते पब्लीक डोमेन रजिस्टर (PDR) या अधिकृत डोमेन पुरवठा करणा-या कंपनीचे रीसेलर म्हणून २००८ पासून काम करीत आहेत. परंतू त्यांनी त्यांच्या कंपनीचा नायजेरीया येथील खोटा पत्ता दिला आहे. तसेच नायजेरीया मध्ये www.domainkings.ng या नावाने Hannu International Corp. Pvt.Ltd. या बनावट कंपनी उघडली आहे. त्यांनी आजअखेर ४० हजार बनावट डोमेन रजीस्टर केलेले असून बॅकसपोर्ट देणेसाठी १४ कंम्प्युटर वरुन २४ तास सपोर्ट देण्यात येतो. पैसे घेण्यासाठी त्यांनी www.perfectmoney.com व www.wrtransfer.com या हॉगकॉंग बेस वॅलेटचा वापर केला आहे. या बनावट डोमेनचा वापर गुन्हेगारांनी १)मेल स्फूफींग (मॅन इन मिडल), २)इन्श्युरन्स फ्रॉड,३)जॉब फ्रॉड,४)लॉटरी फ्रॉड,५)टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स फ्रॉड,६)सीडस् फ्रॉड, ७)ऑनलाईन

बीझनेस फ्रॉड, ८)मल्टीलेवल मार्केटींग फ्रॉड इ. सायबर गुन्हे करण्यासाठी केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

वरील कामगिरी पोलीस उप-आयुक्त आर्थीक व सायबर गुन्हे श्री. दिपक साकोरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पवार, पोलीस निरीक्षक सौ.राधीका फडके, स.पो.नि. विजयमाला पवार, सचिन गवते, पोलीस कर्मचारी संतोष जाधव, राजकुमार जाबा, दिपक भोसले, अमित अवचरे, अस्लम आत्तार, शाहरुख शेख, योगेश वाव्हळ, उज्वला तांबे यांनी केली आहे.

नमुद दाखल गुन्ह्याचा तपास सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक सौ.राधीका फडके हे करीत आहेत.



